# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/          /२०१८

पुणे शहर, दिनांक-३०/१०/२०१८

**विषय :- दिनांक- ३१/१०/२०१८ रोजी, राष्ट्रीय एकता दिवस निमित्त, परेड संचलन/रॅलीचे आयोजन केले बाबत.**

---

दिनांक-३१ ऑक्टोंबर २०१८ हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंतीचे स्मरनार्थ पुणे शहर पोलीस दल, पुणे शहर वाहतुक शाखा, राज्य राखीव बल गट क्र.१ व २, पुणे ग्रामिण पोलीस दल, लोहमार्ग पोलीस दल पुणे, होमगार्ड विभाग असे संयुक्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करणार आहेत त्यानिमित्ताने दिनांक- ३१/१०/२०१८ रोजी दुपारी १५.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज उद्यान(बालगंधर्व नाट्य मंदिराचे मागे) येथे नमूद विभागांचे प्रत्येकी एक प्लाटून व बॅन्डपथक हजर राहून दुपारी १६.१५ वा. शपथ घेतली जाणार आहे. त्यानंतर सदर ठिकाणाहून परेड मार्च /रॅली काढणार आहेत,रॅलीचा मार्ग खालील प्रमाणे आहे.

**परेड संचलन मार्ग-**

छत्रपती संभाजी महाराज उद्यान(बालगंधर्व नाट्य मंदिराचे मागे) येथून डाव्या बाजूने- झाशीराणी पुतळा चौक- मॉर्डन कॉलेज चौक- शिवाजीनगर वाहतुक विभाग कार्यालय- पोलीस अधिकारी यांचा इस्टर्न बंगला- पोलीस मुख्यालय शिवाजीनगर वसाहतीचे गेटमधून पोलीस मुख्यालय मैदान येथे विसर्जन.

तरी नागरीक/वाहनचालकांना अवाहन करण्यात येते की, वरील मार्गावरुन परेड संचलन जस-जसे पुढे जाईल तसे सदर मार्गावरील वाहतुक काही वेळापुरतीच वळविण्यात/थांबविण्यात येईल व परेड संचलन तेथून पुढे मार्गस्थ झाल्यावर परत सदर रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात येईल. तरी नागरिकांनी,वाहनचालकांनी सदर कार्यक्रमाची माहीती घेऊन आपली गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

Scanned by CamScanner